# महाराष्ट्र विधानपरिषद
# दिवसाच्या कामकाजाचा क्रम
# बुधवार, दिनांक २५ जुलै, २०१२
## (सकाळी ११.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**(१) उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री** : "दिनांक १ एप्रिल, २०११ ते ३१ मार्च, २०१२ या कालावधीत शासनाच्या वेगवेगळया विभागांतर्गत संस्था, उपक्रमांनी घेतलेल्या कर्ज, कर्जरोखे व त्यावरील व्याजास देण्यात आलेल्या हमीविषयीचे विवरणपत्र", सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**(२) सामाजिक न्याय मंत्री** : "लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), मुंबई यांचा सन २००२-२००३ या वर्षाचा अठरावा वार्षिक अहवाल", सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**(३) जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री** :

**(अ)** "मा.राज्यपालांनी पाटबंधारे विकास क्षेत्रासंदर्भात दिलेल्या निदेशांच्या अनुषंगाने वर्ष २०११-२०१२ मधील वितरीत करण्यात आलेला निधी व मार्च, २०१२ अखेर झालेल्या खर्चाबाबतचा तपशील", सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**(ब)** "महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचा सन २०१०-२०११ या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल", सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**(क)** "महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचा सन २०१०-२०११ या वर्षाचा

अलग लेखा परीक्षा अहवाल", सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

(४) **महिला व बाल विकास मंत्री** : "महिला आर्थिक विकास महामंडळ यांचा सन २०१०-२०११ या वर्षाचा छत्तीसावा वार्षिक अहवाल", सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**तीन : आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**वैद्यकीय शिक्षण मंत्री** : "दिनांक १३ डिसेंबर, २०१० रोजी सभागृहात म.वि.प.नियम १०६ अन्वये शासकीय ठराव संमत करतेवेळी झालेल्या चर्चेस उत्तर देताना मंत्री, वैद्यकीय शिक्षण यांनी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती", सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**चार : विधानपरिषदेने संमत केलेल्या विधेयकांना विधानसभेची संमती मिळाल्याचे जाहीर करण्यात येईल.**

**पाच म.वि.प. नियम ९३ अन्वये निवेदने पटलावर ठेवणे.**

**सहा : (अ) लक्षवेधी सूचना - (म.वि.प.नियम १०१ अन्वये) -**

(१) **(सोमवार, दिनांक २३ जुलै, २०१२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना) -**

**सर्वश्री.विनोद तावडे,** चंद्रकांत पाटील, रामनाथ मोते, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"मुंबईत सर्वसामान्यांसाठी घरे बांधण्यासाठी मोठी जबाबदारी असलेल्या म्हाडाकडे घर बांधणीसाठी किरकोळ जमीन उरलेली असताना सन १९९९ ते २००२ या कालावधीत म्हाडाचे तब्बल ६७ भूखंड राजकीय नेते वा त्यांच्या सगेसोयऱ्यांच्या संस्थांना नाममात्र दरात वाटप केल्याचे नुकतेच उघडकीस येणे, या भूखंड वाटपामुळे "म्हाडा" ला सुमारे २० हेक्टर जागेवर पाणी सोडावे लागणे, या प्रकरणी २००४ मध्ये मा. उच्च न्यायालयाने देखील सदर भूखंड वाटप चुकीचे असल्याचे मत व्यक्त केले असणे, सध्या म्हाडाकडे केवळ २०,००० स्क्वे.मिटर जागा उपलब्ध असणे, सर्वसामान्यांसाठी रास्त दरात घरे बांधण्याचा उद्देश साध्य करण्यासाठी अतिरिक्त भूखंडाची आवश्यकता असल्याने म्हाडा बाजारभावाने खाजगी जमीनी विकत घेत असल्याचे उघडकीस येणे, म्हाडाच्या सदनिकांचा दर वाढून म्हाडाची स्थापना

करण्यामागचा उद्देश पराभूत होणे, परिणामी सर्वसामान्य मुंबईकरांमध्ये शासनाविषयी तीव्र संताप व चीड पसरणे, या भूखंड वाटपाची न्यायालयीन चौकशी करण्याची आवश्यकता, या सर्व भूखंडांचे वाटप रद्द करुन ते ताब्यात घेऊन त्याठिकाणी सामान्य माणसांसाठी घरे बांधण्याची नितांत आवश्यकता, या प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री. संजय पाटील,** रमेश शेंडगे, विनायकराव मेटे, प्रकाश बिनसाळे, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुभाष चव्हाण, हेमंत टकले, विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, श्रीमती उषाताई दराडे, सर्वश्री राम पंडागळे, कपिल पाटील **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"पुणे जिल्ह्यातील खेड शिवापूरच्या टोल नाक्यावर टोल नाक्याचे मालक, व्यवस्थापक व कर्मचाऱ्यांकडून अरेरावीने, धाकदपटशा करुन टोल वसुली करण्यात येणे, शासनाशी केलेल्या कराराप्रमाणे बंधनकारक असलेल्या सोई-सुविधा प्रवाशांना न मिळणे, सदर टोल नाक्यावरील कर्मचाऱ्यांकडून लोकप्रतिनिधींचा सुध्दा अवमान करण्यात येणे, टोल नाक्यावरील कर्मचारी स्वतःकडे घातक प्रकारची हत्यारे ठेवणे, ड्रेस न घालणे आणि टोल देताना खूप विलंब लावणे, त्यामुळे त्या रस्त्यावरुन प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या मनामध्ये पसरलेले भितीचे वातावरण, प्रसंगी तिथे होणारी हाणामारी, परिसरात अशांतता पसरण्याचा निर्माण झालेला धोका व दहशतीचे वातावरण, सदर टोल नाका रद्द करण्याची होत असलेली मागणी, तसेच सदरहू टोल नाक्यावर तसेच एकूणच राज्यात इतर राज्यांच्या तुलनेत ज्यादा दराने टोल वसुल करण्यात येत असल्यामुळे त्याला आळा घालणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **श्री. चरणसिंग सप्रा, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **वने मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"मुंबई, मुलुंड येथील वनक्षेत्र प्राधिकरणानुसार (संजय गांधी) उद्यानाचा उपभाग म्हणून घोषीत केलेल्या हनुमान पाडा-१, हनुमान पाडा-२, पंचशीलनगर, गणेशपाडा, राहुल नगर, शंकर टेकडी या भागातील रहिवाश्याचे या ठिकाणी ४० ते ३५ वर्षापासून वास्तव्य असून, या ठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत विकास कामासाठी बऱ्याच प्रकारचे निर्माण झालेले अडथळे, सदर विभागात शासनाकडून जारी करण्यात आलेली पुनर्वसन / हस्तांतरणाची नोटीस लावण्यात आलेली असणे, येथील रहिवाशांचे दूर अंतरावर पुनर्वसन

करण्यात येणार असल्याने त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा व उपजिवीकेच्या साधनावर विपरीत परिणाम होणार असणे, नविन भागात स्थलांतर केल्याने वास्तव्याचा दाखला, रेशनकार्ड, पॅनकार्ड, मतदार ओळखपत्र इत्यादी सरकारी पुरावे बदलावे लागणार असून त्याचा बराच मन:स्ताप होणार असणे, सन १९९५ च्या पूर्वीचे वास्तव्याचे पुरावे असूनही ते गमावण्याची भिती निर्माण होणे, सन १९९५ नंतर खरेदी केलेल्या सदनिकाधारकांना वनक्षेत्र प्राधिकरणामध्ये मुल्यजमा करता न आल्याने त्यांना मुल्य भरण्यासाठी मुदतवाढ मिळण्याची आवश्यकता असणे, सदर वसाहतीतून १९७६ पासून केलेक्टर मार्फत कर वसूल होत असणे, सदरील रहिवाश्यांचे पुनर्वसन करण्यासाठी मुलुंडमध्ये पब्लीक हाऊसींगचे आरक्षण असलेल्या मोकळ्या भूखंडावर / जागेवरच पुनर्वसन करण्यात यावे अशी येथील रहिवाश्यांची आणि लोकप्रतिनिधीची शासनाकडे सतत होत असलेली मागणी, जनमानसात पसरलेली असंतोषाची भावना, त्यामुळे सदर रहिवाश्यांचे पुनर्वसन नियम ३३(१०) अंतर्गत मुलुंडमध्येच करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया".

(४) **सर्वश्री. भगवान साळुंखे,** चंद्रकांत पाटील, रामनाथ मोते, डॉ. रणजित पाटील, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"दिनांक ४ एप्रिल, २०१२ रोजीच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या शासन निर्णयानुसार राज्यातील अकृषि विद्यापीठांच्या सलग्नित १५४ महाविद्यालयांतून संगणशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स व शारिरिक शिक्षण हे कायम विनाअनुदानित मान्यता दिलेले विषय अनुदानित करण्यात येणे, त्यासाठी आठ कोटींची तरतूद करण्यात आलेली असणे, मात्र या विषयाचे अध्यापन करीत असलेला शिक्षकवर्ग या अनुदानाच्या प्रतिक्षेत असणे, आज तीन महिन्यांचा कालावधी ओलांडला असला तरी अद्याप अंमलबजावणीच केलेली नसणे, त्यामुळे या तिन्ही विषयांच्या शिक्षकांच्या मनामध्ये संभ्रमावस्था असणे, त्यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **डॉ.दिपक सावंत,** सर्वश्री. रामनाथ मोते, विनोद तावडे, भगवान साळुंखे, नागो गाणार, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुभाष चव्हाण, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"शिक्षण हक्क विधेयक २००९ मधील तरतूदीनुसार आर्थिकदृष्टया कमकुवत व दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना खाजगी शाळांमध्ये प्रवेशासाठी २५ टक्के आरक्षण ठेवणे बंधनकारक

असणे, यामुळे राज्यातील सुमारे ९५,००० ते ९८,००० हजार विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणे अपेक्षित असताना खाजगी संस्थांनी शासन आदेश धुडकावून प्रवेशप्रक्रिया पूर्ण करणे, वेळोवेळी मुदत वाढवूनही खाजगी संस्थांनी २५ टक्के प्रवेशाचे बंधन न पाळणे, खाजगी संस्थांवर शासनाचा कोणताही अंकुश नसणे, गरीब व मागासवर्गीय विद्यार्थ्यांवर अन्याय होणे, दोषी संस्थांविरुध्द शासनाने कोणतीही कारवाई न करणे, २५ टक्के आरक्षणाचा केवळ देखावा करणे, कायद्याची व शासननिर्णयाची अंमलबजावणी न होणे, परिणामी पालकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण होणे, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही."

**(ब) लक्षवेधी सूचनेवरील निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे (जोडपत्र पहावे.) -**

**सात : विशेष उल्लेख सूचना - असल्यास -**

**आठ : (मंगळवार, दिनांक २४ जुलै, २०१२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला प्रस्ताव) -**

**सर्वश्री विनोद तावडे,** दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत पाटील, चंद्रकांत पाटील, डॉ.दिपक सावंत, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ.निलम गोऱ्हे, सर्वश्री रामनाथ मोते, केशवराव मानकर, पाशा पटेल, डॉ.रणजित पाटील, श्री.नागो गाणार, **वि.प.स. याचा म.वि.प.नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव -**

"मुंबईतील शासकीय जागा विविध समाज उपयोगी कार्यासाठी कमी दरात लीजवर दिलेल्या असताना त्या संस्थांनी ह्या जागेचा वापर व्यावसायिक कारणासाठी करणे, सदर भूखंडाचा उपयोग व्यावसायिक कारणांसाठी होऊन देखील संबंधीत संस्थांनी ५० टक्के अनर्जित उत्पन्न शासनाकडे जमा न करणे, नगरविकास विभागाच्या सतत बदलत्या धोरणामुळे गिरणी कामगारांचा घराचा प्रश्न बिकट होणे, म्हाडाकडून होणाऱ्या भूखंड वाटपात मोठया प्रमाणात गैरव्यवहार होणे, नवी मुंबई सिडको मधील भूखंड घोटाळ्याप्रकरणी शंकरन समितीने अहवाल सादर करुन देखील, ह्या अहवालावर कारवाई न होणे, पुणे शहराजवळ सुस गावामध्ये ओकवुड गृहनिर्माण संस्थेने केलेल्या भूखंड घोटाळ्यासह अनेक भूखंड घोटाळे झाल्याचे उघडकीस येणे, महापालिका हद्दीबाहेर व एम.एम.आर.क्षेत्रामध्ये उभी राहिलेली अनधिकृत गोदामे, अनधिकृत बांधकामे वाढलेली असताना व याबाबत तक्रारी करुन देखील गृह विभागाकडून कोणतीही कारवाई न होणे, विजय पालांडे, लैला खान इत्यादीच्या प्रकरणात तपासामध्ये गृह विभागाच्या अधिकाऱ्यांकडून दुर्लक्ष होणे, मुंबई शहरामध्ये सी.सी.टी.व्ही.यंत्रणा

बसविण्याचा निर्णय होऊनही शासनाने त्याबाबत चालढकलीचे धोरण स्वीकारणे, गृह विभागातील भ्रष्टाचारामुळे जनतेचा पोलीस दलावरील विश्वास डळमळीत होणे, नगरविकास, गृहनिर्माण व गृह या महत्वाच्या खात्यात असणाऱ्या भ्रष्टाचारामुळे अब्जावधी रुपयाचे शासनाचे झालेले नुकसान व त्यामुळे महाराष्ट्रातील कोट्यावधी जनतेमध्ये निर्माण झालेला असंतोष व याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**दुपारी ३.०० ते ३.३० वाजेपर्यंत - मध्यंतर**

**नऊ : म.वि.प.नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा -**

(१) **सर्वश्री. अनिल भोसले,** जयवंतराव जाधव, दिपकराव साळुंखे, सुभाष चव्हाण, **वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील :-**

"राज्यातील महानगरपालिकांमधील शिक्षण मंडळाच्या तसेच जिल्हा परिषदांच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना गणवेश, पुस्तके व शालेय साहित्याचा पुरवठा शाळा सुरु झाल्यानंतरही अनेक दिवसांनी उशीरा केला जाणे, सर्वशिक्षा अभियान कार्यक्रमासाठी दिला जाणारा निधी अखर्चित राहणे, तसेच या निधीच्या खर्चात मोठ्या प्रमाणात सुरु असलेली अनियमितता, अनेक शाळांमधील शाळा खोल्यांची दयनीय अवस्था असणे, मुलामुलीकरीता स्वतंत्र स्वच्छतागृह नसणे, परिणामी शिक्षणासाठी पुरेशा मूलभूत सोयीसुविधांचा अभाव व शैक्षणिक गुणवत्तेतील प्रश्नचिन्हांमुळे महानगरपालिका शाळांमधील विद्यार्थ्यांची रोडावलेली संख्या, शाळेतील शिक्षक पदवीधर व पदव्युत्तर पदविधर असतात मात्र त्या शाळांबाबत निर्णय घेणाऱ्या शिक्षण मंडळाच्या सदस्यांची शैक्षणिक अर्हता ४ थी व ७ वी उत्तीर्ण ठेवण्यात आल्यामुळे पदाधिकारी व शिक्षकांच्या शिक्षणामध्ये निर्माण झालेली दरी, त्यामुळे शिक्षण मंडळ सदस्यांच्या शैक्षणिक अर्हतेमध्ये तसेच अधिकाऱ्यांमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता, राज्यातील मनपा शाळांमध्ये पुरेसे प्रशिक्षीत शिक्षक उपलब्ध करुन सर्व शाळांसाठी स्वतःच्या इमारती, पिण्याचे पाणी व स्वच्छतागृहांच्या सुविधा पुरविण्याची आवश्यकता याबाबत शासनामार्फत करण्यात येणारी कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **श्री.दिवाकर रावते, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील :-**

"कोल्हापूर जिल्ह्यात सर्वत्र महिन्याभरापासून काविळीची साथ मोठ्या प्रमाणात पसरलेली असून त्याची लागण सुमारे ५ हजार लोकांना झाली आहे, दुषित पाण्यामुळे साथ पसरुन त्यात १० ते १५ लोकांचा मृत्यू झाला असून काही रुग्ण गंभीर स्थितीत आहेत, कोल्हापूर महानगरपालिकेने, जिल्हा परिषदने व इचलकरंजी नगरपालिकेतर्फे पाणी दुषित

होऊ नये याकरिता कोणती तातडीची उपायोजना करण्यात आली आहे, काविळीची साथ आटोक्यात आणण्यासाठी शासनाच्या अधिकाऱ्यांकडून त्वरित कार्यवाही न झाल्याने काविळीची साथ पसरुन त्याचा त्रास लोकांना झालेला आहे त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता आहे."

**दहा : शासकीय विधेयके -**

**विधानसभेने संमत केल्यास - विचार, खंडशः विचार व संमत करणे -**

**(१) सन २०११ चे वि.स.वि.क्रमांक ५० - महाराष्ट्र महानगरपालिका (चौथी सुधारणा) विधेयक, २०११.**

**(२) सन २०११ चे वि.स.वि. क्रमांक ५५ - मुंबई प्रांतिक महानगरपालिका (सुधारणा) व नागपूर शहर महानगरपालिका (निरसन) विधेयक, २०११.**

**(३) सन २०११ चे वि.स.वि. क्रमांक ६७ - मुंबई महानगरपालिका (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०११.**

**(४) सन २०१२ चे वि.स.वि. क्रमांक २० - मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०१२.**

**(५) सन २०१२ चे वि.स.वि. क्रमांक २६ - मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन, हैद्राबाद कुळवहिवाट व शेतजमीन आणि मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश) (सुधारणा) विधेयक, २०१२.**

## " राष्ट्रगीत ".

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २४ जुलै, २०१२.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.